2 8 AUG 2022
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बनावट परिपत्रक; गुन्हा दाखल करणार

## अजितसिंह जाधव : विद्यार्थ्यांनी अशा प्रकाराकडे दुर्लक्ष करावे

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षा सुरळीत सुरू आहेत. तरीसुद्धा अज्ञात व्यक्तीने एम.एस्सी भाग-१, सत्र-२ (फिजिकल केमिस्ट्री-२) हा पेपर मंगळवारी (दि. २३) दुपारी ४ ते ५ या कालावधीत सुरळीत झालेला असतानाही तो रद्द झाला आहे, असे परिपत्रक प्रसारित केले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला. याबाबत त्याच्यावर विद्यापीठ प्रशासनातर्फे सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला जाणार आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी शनिवारी दिली.

चुकीच्या परिपत्रकाद्वारे परीक्षा केंद्र व परीक्षार्थी यांच्यामध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र बनावट परिपत्रकाकडे परीक्षा केंद्र, तसेच परीक्षार्थींनी दुर्लक्ष करावे, असे आवाहन जाधव यांनी केले.

विधी अभ्यासक्रमाचा 'इंटील्येक्चूअल प्रॉपर्टी लॉ' हा २६ जुलै रोजी झालेला पेपर रद्द केला होता. हा पेपर उद्या, सोमवारी (दि. २९) दुपारी १ ते २ या कालावधीत होणार आहे.

पुढारी

# विद्यापीठाकडून 'युवा महोत्सव' आयोजनाबाबत जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी विद्यापीठामार्फत दरवर्षी युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. युवा महोत्सवाची माहिती व्हावी. जास्तीत जास्त महाविद्यालयांनी सहभागी होण्याच्या दृष्टीने ज्या-त्या जिल्हास्तरावर शिवाजी विद्यापीठाच्यावतीने एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविदयालयांमध्ये कार्यशाळा होणार आहेत. केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोल्हापूर (६ सप्टेंबर), कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय, पलूस, जि.सांगली (७ सप्टेंबर), बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, जि.सातारा (८ सप्टेंबर) या महाविदयालयांमध्ये सकाळी १० ते ५ यावेळेत कार्यशाळा होणार आहे, अशी माहिती शिवाजी विदयापीठ विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही.गुरव यांनी दिली.

2 8 AUG 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# चुकीच्या परिपत्रकाद्वारे परीक्षार्थींमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न

## शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन संचालक डॉ. जाधव यांची माहिती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाअर्तंगत मार्च-एप्रिलच्या सुधारित परीक्षा वेळापत्रकानुसार एम. एस्सी. भाग १ सत्र २ (फिजिकल केमिस्ट्री - २) हा पेपर २३ ऑगस्ट रोजी दुपारी ४ ते ५ या कालावधीत सुरळीत झालेला आहे. याबाबत विद्यापीठ परीक्षा विभागाद्वारे पेपर रद्द झाल्याबाबत कोणतेही परिपत्रक प्रसिद्ध केलेले नाही. अज्ञात व्यक्तीने या परीक्षेबाबत या विषयाबाबत बनावट परिपत्रक प्रसारित केली आहे, त्याच्यावर विद्यापीठ प्रशासनातर्फे गुन्हा नोंदविण्यात येणार आहे, अशी माहिती परीक्षा व मुल्यमापन संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली आहे.

चुकीच्या परीपत्रकाद्वारे परीक्षा केंद्र व परीक्षार्थी यांच्यामध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मात्र बनावट परिपत्रकाकडे परीक्षा केंद्र तसेच परीक्षार्थींनी दुर्लक्ष करावे, असे आवाहन डॉ. जाधव यांनी केले आहे. त्याचबरोबर अशी चुकीची माहिती प्रसारित करणाऱ्या अज्ञात व्यक्तीवर विद्यापीठ प्रशासनामार्फत सायबर सेल येथे गुन्हा नोंदविण्यात येणार असल्याचे ही त्यांनी सांगितले.

### 'लॉ'चा पेपर सोमवारी

विधी अभ्यासक्रमाचा 'इंटील्येक्चुअल प्रॉपर्टी लॉ' हा २६ जुलै रोजी झालेला पेपर काही कारणास्तव रद्द करण्यात आला. हा पेपर सोमवारी ( दि. २९ ऑगस्ट ) दुपारी १ ते २ या वेळेमध्ये संबंधित विधी परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. या परीक्षेस गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांची पुन्हा परीक्षा घेतली जाणार नाही, असेही डॉ. जाधव यांनी स्पष्ट केले आहे.

पुण्यनगरी

# एम.एस्सी. पेपर रद्द नाही

## डॉ. अजितसिंह जाधव

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च-एप्रिलच्या सुधारित परीक्षा वेळापत्रकानुसार एम.एस्सी. भाग १ सत्र २ (फिजिकल केमिस्ट्री - २) हा पेपर रद्द झालेला नाही, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली आहे. हा पेपर दि. २३ ऑगस्ट रोजी झाला आहे. याबाबत विद्यापीठ परीक्षा विभागाद्वारे पेपर रद्द झाल्याबाबत कोणतेही परिपत्रक प्रसिद्ध केलेले नाही. अज्ञात व्यक्तीने या परीक्षेबाबत या विषयाबाबत बनावट परिपत्रक प्रसारित केले आहे. त्याच्यावर प्रशासनातर्फे गुन्हा नोंदविण्यात येणार आहे, असेही ते म्हणाले.

### 'लॉ'चा उद्या पेपर

विधी अभ्यासक्रमाचा 'इंटिलेक्च्युअल प्रॉपर्टी लॉ' हा दि. २६ जुलै रोजी झालेला पेपर रद्द करण्यात आला. हा पेपर दि. २९ रोजी संबंधित विधी परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांची पुन्हा परीक्षा घेतली जाणार नाही, असे डॉ. जाधव यांनी स्पष्ट केले आहे.

2 8 AUG 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एम.एस्सी. भाग -१ चा केमिस्ट्री पेपर सुरळीत

कोल्हापूर, ता. २७ : मार्च / एप्रिल २०२२ च्या सुधारित परीक्षा वेळापत्रकानुसार एम.एस्सी. भाग १ सत्र दोनमधील फिजिकल केमिस्ट्री पेपर सुरळीत झाल्याचे पत्रक शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने प्रसिद्धीस दिले.

हा पेपर रद्द झाल्याबाबत कोणतेही परिपत्रक प्रसारित केलेले नाही, काही अज्ञात व्यक्तीने या विषयाबाबत बनावट परिपत्रक/ बातमी समाजमाध्यमात प्रसारित केली. यामुळे परीक्षा केंद्र व परीक्षार्थींत संभ्रम निर्माण झाला आहे. अज्ञात व्यक्तीकडून तयार केलेले बनावट परिपत्रक/ बातमी दुर्लक्षित करावी. त्या व्यक्तीवर विद्यापीठ प्रशासनातर्फे सायबर सेल येथे गुन्हा नोंदविण्यात येऊन कार्यवाही करण्यात येणार आहे.

दरम्यान, विधी अभ्यासक्रमाचा इंटेलेक्च्युल प्रॉपर्टी राइट पेपर काही अपरिहार्य कारणास्तव रद्द केला आहे. तो सोमवारी (ता.२९) दुपारी एक ते दोन या वेळेत होणार आहे. या परीक्षेस गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांची पुन्हा परीक्षा घेतली जाणार नाही.

2 8 AUG 2022 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पेपरविषयी चुकीचे परिपत्रक व्हायरल

## अज्ञातावर गुन्हा नोंद करून, सायबर सेलमार्फत करणार चौकशी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत एमएस्सी भाग एक सत्र दोनचा फिजिकल केमेस्ट्री -२ पेपर २३ ऑगस्ट रोजी सुरळीत पार पडला आहे. परंतू विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रम निर्माण करण्यासाठी जुन्या परिपत्रकात छेडछाड करून हा पेपर २६ ऑगस्टला होणार असे परिपत्रक अज्ञाताने व्हायरल केले आहे. हे परिपत्रक काही महाविद्यालयांपर्यंत पोहाचल्यानंतर विद्यापीठ परीक्षा विभागाकडे चौकशी केली असता हे परिपत्रक फेक असल्याचे सांगण्यात आले. या प्रकाराची तक्रार सायबर सेलकडे देवून चौकशी अंती संबंधीतावर कायद्यानुसार कारवाई केली जाईल, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

एमएस्सी फिजिकल केमेस्ट्री-२ पेपर २३ ऑगस्ट रोजी दुपारी ४ ते ५ या वेळेत झाला आहे. तरीही हा पेपर २६ ऑगस्ट रोजी होणार असे परिपत्रक अज्ञात व्यक्तीने चुकीच्या पध्दतीने व्हायरल केले आहे. या अज्ञात व्यक्तीच्या विरोधात गुन्हा नोंदवला जाणार आहे. तसेच सायबर सेलमार्फत चौकशी करून संबंधीतावर कडक कारवाई केली जाईल. तरी महाविद्यालये, विद्यार्थी, पालक यांनी गोंधळून न जाता या परिपत्रकाकडे दुर्लक्ष करावे, असे आवाहन परीक्षा संचालक डॉ. जाधव यांनी परिपत्रकाव्दारे केले आहे.

- **परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांची माहिती**
- **'फिजिकल केमेस्ट्री-२' पेपरचा प्रकार**

### इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी राईटस पेपर उद्या

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत विधी



अभ्यासक्रमातील तृतीय वर्षाच्या 'इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी राइट्स' (आयपीआर) या विषयाचा २६ रोजी होणारा पेपर अपरिहार्य कारणाने रद्द केला होता. रद्द केलेला पेपर सोमवार २९ रोजी दुपारी १ ते २ या वेळेत होणार आहे. यासंदर्भातील माहिती महाविद्यालये व विद्यार्थ्यांना परिपत्रकाव्दारे कळवली होती. तरीही ही पुर्नपरीक्षा होवू नये, या मागणीचे निवेदन विद्यार्थ्यांनी विद्यापीठाला दिले आहे. तरीही हा पेपर २९ रोजी होणार आहे. या परीक्षेला न बसणाऱ्या विद्यार्थ्यांची पुन्हा परीक्षा घेतली जाणार नाही, याची महाविद्यालये, विद्यार्थी व पालकांनी नोंद घ्यावी.